महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
MAHATMA PHULE KRISHI VIDYAPEETH, RAHURI
अन्नं बहु कुर्वीत
तद् व्रतम्
1969

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

## एप्रिल २०२५

# ई वार्ता




**LEGEND**

| | | |
|---|---|---|
| ■ | Central Campus of MPKV | |
| ● | Agril. Research Station | 27 |
| ★ | Post Graduate Institute | 01 |
| ✿ | Agril. Technology Information Centre | 01 |
| ⚘ | Regional Extension Centre | 04 |
| ✸ | District Extension Centre | 05 |
| ❄ | Krishi Vigyan Kendra | 04 |
| ✖ | Agricultural Tech. School | 08 |
| ✪ | Agricultural Engg. College | 02 |
| ✡ | Agricultural College | 08 |
| 8 | Horticulture College | 02 |
| © | ABM College -1 | 01 |
| @ | Food Technology College - 1 | 01 |
| # | Agriculture Polytechnic College - 1 | 01 |

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २७८५/२०२५

मफुकृवि ई वार्ता

एप्रिल २०२५

वर्ष :५, अंक क्रं. : ५२, एप्रिल, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी


## महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा ३८ वा पदवीप्रदान समारंभ संपन्न







**दि. २२ एप्रिल, २०२५.** राहुरी येथील महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा ३८ व्या पदवीप्रदान समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल तथा महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलपती श्री. सी.पी. राधाकृष्णन उपस्थित होते. यावेळी कृषि मंत्री तथा कृषि विद्यापीठाचे प्रतिकुलपती ना.ॲड. माणिकराव कोकाटे, विधानपरिषदेचे सभापती ना.श्री. राम शिंदे, नवी दिल्ली येथील कृषि शिक्षण व संशोधन विभागांतर्गत असलेल्या कृषि वैज्ञानिक निवड मंडळाचे अध्यक्ष डॉ. संजय कुमार हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख, राज्यपालांचे ए.डी.सी. श्री. अभयसिन्हा देशमुख, अधिष्ठाता (कृषि) डॉ. साताप्पा खरबडे, विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सदस्य डॉ. प्रदिप इंगोले, श्री. दत्तात्रय उगले, श्री. गणेश शिंदे, श्री. संजीव भोर, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कुलसचिव डॉ. नितीन दानवले, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रविंद्र बनसोड, नियंत्रक श्री. सदाशीव पाटील आणि विद्या शाखेचे उपकुलसचिव श्री. हेमंत सोनार उपस्थित होते.

यावेळी राज्यपाल श्री. सी.पी. राधाकृष्णन मार्गदर्शन करतांना पुढे म्हणाले की वाढता उत्पादन खर्च, मर्यादित बाजारपेठ प्रवेश आणि अपुरी भावनिश्चिती प्रणाली यामुळे कृषि क्षेत्र अधिक अडचणीत येत असतांना भारतीय शेतीला शाश्वत, आर्थिक लाभाची आणि भविष्यासाठी सक्षम व्यवसायात रूपांतरित करण्यासाठी कृषि विद्यापीठांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. तुमचे ज्ञान आणि तुमची जिद्द हीच तुमची प्रेरणा आहे जिचा प्रकाश तुमच्या पुढील जीवन प्रवासात मार्गदर्शक ठरेल. आजपासुन तुम्ही नव्या प्रवासाची सुरुवात करत आहात. भारतीय शेतीला शाश्वत व आर्थिक लाभाची करण्यात कृषि विद्यापीठांची महत्वाची भुमिका असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल तथा महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलपती श्री. सी.पी. राधाकृष्णन यांनी केले. आजचा दिवस हा सर्व पदवीधारक आणि पदक विजेत्यांसाठी अत्यंत आनंदाचा आहे. तुम्ही केवळ पदवीधर नाही, तर भारतीय कृषि क्षेत्राचे भविष्य आहात. तुम्ही ज्ञान आणि कौशल्याने सज्ज आहात आणि समोरील संधी व आव्हानांना समर्थपणे सामोरे जाण्यास सक्षम आहात. जे ज्ञान तुम्ही प्राप्त केले आहे ते प्रात्येक्षिकात उतरविण्याचा प्रयत्न करा. सन २०४७ विकसीत भारतामध्ये कृषिचा मोठा वाटा राहणार आहे. हवामान बदलांना तोंड देणाऱ्या पिकांच्या जाती विकसित करून, सेंद्रिय शेती, समग्र अन्नद्रव्य व्यवस्थापन आणि सूक्ष्म सिंचनाचा प्रसार करून कृषि विद्यापीठे हवामान बदलांचे परिणाम कमी करण्यात आणि उत्पादकता वाढवण्यात मदत करू शकतात. कृषि पदवीधरांनी स्थानिक घटक लक्षात घेऊन पिकांचे वाण विकसित करावे. विद्यापीठांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन आणि अचूक शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या साधनांसारख्या डिजिटल तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेतकऱ्यांना योग्य वेळी आवश्यक माहिती पुरविणे गरजेचे आहे. कृषि प्रक्रिया उद्योगाला प्रोत्साहन आणि कृषि मूल्य साखळी विकसित करणेही महत्वाचे आहे. कृषिच्या विद्यार्थ्यांनी शेती फायदेशीर होण्यासाठी आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी प्रयत्न करावेत. विद्यापीठाने शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी विविध पिकांच्या जाती आणि तंत्रज्ञान विकसित करण्याचे प्रशंसनीय कार्य केले आहे. डिजिटल शेतीच्या क्षेत्रात विद्यापीठाची झालेली प्रगती ही एक भूषणावह बाब आहे. विद्यापीठाचा हा पुढाकार शेतकरी समुदायापर्यंत विकसित झालेली तंत्रज्ञान आणि माहिती सहज आणि आकर्षक पद्धतीने पोहोचवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे गौरवोद्गार राज्यपालांनी काढले.

याप्रसंगी राज्याचे कृषि मंत्री तथा कृषि विद्यापीठाचे प्रतिकुलपती ना.ॲड. माणिकराव कोकाटे म्हणाले की वातावरणतील बदलामुळे शेतीवर विपरीत परिणाम होत आहे. यावर मात करण्यासाठी कृषि क्षेत्रात आमुलाग्र बदल करून नवे तंत्रज्ञान स्विकारावे लागेल. कमी खर्चात

नव्या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अधिक उत्पादन घेण्याचे प्रयत्न करावे लागतील. नव्या कल्पना, सेंद्रिय शेती, कृषि यांत्रिकीकरण, कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेती पद्धतीत बदल घडवून आणावे लागतील. फलोत्पादन आणि उत्तम गुणवत्तेचे उत्पादन करून निर्यातीवर भर देणेही गरजेचे आहे. अधिक उत्पादनासाठी वारेमाप खते व किटकनाशकांच्या वापरामुळे समाजाचे आरोग्य बिघडत चालले आहे. यावर मात करण्यासाठी सेंद्रिय शेतीकडे वळणे गरजेचे आहे. अंशमुक्त कृषि उत्पादनाकडे आता जाणे गरजेचे आहे. विद्यापीठाने संशोधन, शिक्षण व विस्तारामध्ये भरीव योगदान द्यावे आणि कृषि पदवीधरांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग कृषि क्षेत्राच्या उन्नतीसाठी करावा असे आवाहन कृषिमंत्र्यांनी केले. राज्य शासन विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यामाध्यमातून शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी कायमच कटीबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

प्रमुख पाहुणे डॉ. संजय कुमार आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना उद्देशुन म्हणाले की प्रिय पदवीधरांनो, सन २०५० पर्यंत भारताची लोकसंख्या १.७ अब्ज होईल. एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या अन्नाची गरज भागविण्यासाठी आपल्याला अन्नधन्य उत्पादनात ७० टक्के वाढ करावी लागेल. त्यासाठीची पूर्वतयारी म्हणजे आता कृषि उद्योजकतेची जाहिरात करण्याची वेळ आली आहे. त्यासाठी कार्यक्षम अशी मूल्य साखळी तयार करा. कच्च्या मालावर प्रक्रिया करण्यासाठी बायोमॅन्युफॅक्चरिंग हब तयार करा. ब्रॅण्डिंगला प्रोत्साहित करा. बाजारपेठेत प्रवेशासाठी विविध आउटलेट किंवा कृषि उत्पादनांचे मॉल तयार करा. तुम्ही नेहमी आपल्या आवडीचा पाठपुरावा केला पाहिजे त्यासाठी उद्याच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी निर्भयपणे नाविन्याचा पर्याय निवडा. ॲग्री उत्पादन मॉल आणि ॲग्रो इको टुरीझम, कृषि उद्योजकतेला प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. सन २०४७ पर्यंत विकसित भारताला हातभार लावून आपल्या अल्मा मॅटरला चमकदार बनवा. प्रत्येक घराचे पोषण करणाऱ्या शेतकऱ्यांना उन्नत करण्यासाठी आपला मनापासून प्रयत्न असला पाहिजे याची जाणीव ठेवा. ते पुढे म्हणाले की आम्हाला शेतीमध्ये जास्तीत जास्त यांत्रिकीकरण करण्याची गरज आहे म्हणून आता नाविन्यपूर्ण आत्मनिर्भरतेसाठी प्रयत्न करण्याची आणि मोठ्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी मोठ्या कल्पनांचा पाठपुरावा करण्याची वेळ आली आहे. या प्रयत्नांबरोबरच पुन्हा एकदा विशेष हरितक्रांती घडवून आणली तरच आपण भविष्यात सर्वांना अन्न उपलब्ध करु शकु असे यावेळी ते म्हणाले.

कुलगुरू डॉ. शरद गडाख विद्यापीठ अहवाल सादर करताना म्हणाले की विद्यापीठाने संशोधन, शिक्षण व विस्तार या तीनही क्षेत्रात दैदिप्यमान कामगिरी केली आहे. शेतकऱ्यांना उपयोगी ठरणाऱ्या १८६६ तंत्रज्ञान शिफारशी, विविध पिकांच्या ३११ वाणांची निर्मिती व ५१ कृषि अवजारे व यंत्रांची निर्मिती विद्यापीठाने केली आहे. राहुरी कृषि विद्यापीठाने विकसीत केलेल्या प्रमुख ८ पीकांच्या उदा. ऊस, डाळिंब, हरभरा, रब्बी ज्वारी, कांदा, भात, लिंबू व बाजरी वाणांचे आर्थिक विश्लेषण केले असता या ८ पिकांच्या वाणामुळे आजपर्यंत राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये ढोबळमानाने एकुण रु. २,४०,१८८ कोटी व निव्वळ ३२,२०६ कोटी रुपये इतक्या महसुली उत्पन्नाची भर पडली आहे. विद्यापीठाने बदलत्या हवामानाला अनुरुप असे शेतकरीभिमुख संशोधन केलेले आहे.

सन्माननीय राज्यपाल तथा कृषि विद्यापीठाचे कुलपती श्री. सी.पी. राधाकृष्णन यांनी यावेळी ४० विद्यार्थ्यांना पीएच. डी., ३३१ विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवी व ४,८३० विद्यार्थ्यांना पदवी असे एकुण ५,२०१ पदव्या प्रदान करण्यात आल्या. पदवीप्रदान सन २०२३–२४ मध्ये बी.एस्स.सी (कृषि) पदवीत प्रथम आलेली कु. प्रज्ञा खर्डे, बी.एस्स.सी (उद्यान विद्या) मध्ये प्रथम आलेली कु. प्राची महाकाळ, कृषि अभियांत्रिकीमध्ये प्रथम आलेला चि. दर्शन सुर्यवंशी यांनी सुवर्णपदक मिळविले. यावेळी पीएच.डी.च्या ८ विद्यार्थ्यांना सुवर्ण, पदव्युत्तर पदवीच्या १९ विद्यार्थ्यांना सुवर्ण, पदवीच्या ९ विद्यार्थ्यांना सुवर्ण व दोन विद्यार्थ्यांना रौप्य पदके प्रदान करण्यात आली. या कार्यक्रमानंतर मान्यवरांच्या शुभहस्ते पदव्युत्तर व कृषि अभियांत्रिकी पदवीच्या विद्यार्थीनींच्या वसतीगृहाचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती वंदन आणि दिप प्रज्वलनाने करण्यात आली. पदवीप्रदान समारंभाला अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. पंकज अशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. आशिष येरेकर, अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, माजी कुलगुरु डॉ. योगेंद्र नेरकर, डॉ. सुभाष पुरी, डॉ. तुकाराम मोरे, डॉ. के.पी. विश्वनाथा, डॉ. एम.सी. वाष्णेय, डॉ. शंकरराव मगर, डॉ. अशोक ढवण, डॉ. किसनराव लवांडे, माजी आ.श्री. चंद्रशेखर कदम, डॉ. हरी मोरे, श्री. तानाजी धसाळ, कृषिभुषण सुरसिंग पवार, विद्या परिषद सदस्य, मान्यवर, पत्रकार, सहयोगी अधिष्ठाता, विभाग प्रमुख, अधिकारी, शास्त्रज्ञ, विद्यार्थी, विद्यार्थीनी व प्रगतशील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई व डॉ. भगवान देशमुख यांनी केले.

## केंद्रीय कृषिमंत्री यांचेशी शासकीय कृषि महाविद्यालय, नंदुरबार च्या विद्यार्थिनींचा सुसंवाद



**दि. ८ एप्रिल, २०२५.** शासकीय कृषि महाविद्यालय, नंदुरबार येथील विद्यार्थ्यांना केंद्रीय कृषि आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंहजी चौहान यांच्याशी सुसंवाद करण्याची संधी मिळाली. कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार व राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमानाने उभारण्यात आलेल्या कृषक ज्ञान विज्ञान मंडपम आणि महिलांसाठी तंत्रज्ञान पार्क या वास्तूंचा लोकार्पण सोहळा केंद्रीय कृषि मंत्री मा. शिवराजसिंहजी चौहान यांच्या हस्ते नुकताच पार पडला. यावेळी कृषि महाविद्यालय, नंदुरबार मधील दिव्यक्ता गावित, नीलम पाडवी, हर्षदा भोये, रोहिणी सूर्यवंशी व इतर पंधरा विद्यार्थिनींना कृषि मंत्र्यांशी संवाद साधण्याची संधी मिळाली. यावेळी कृषीमंत्र्यांनी विद्यार्थिनींशी कृषि शिक्षणातील अडचणी व संधी याविषयी चर्चा करून भविष्यात कृषि शास्त्रज्ञ म्हणून शेतकऱ्यांची सेवा करण्यास सांगितले. सदर लोकार्पण कार्यक्रमासाठी कृषि महाविद्यालय, नंदुरबार येथील ४० विद्यार्थी सहभागी झाले होते. सदर कार्यक्रम भेटीसाठी सहयोगी अधिष्ठाता डॉ. यु. बी. होले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. आर. बी. शेंडे, डॉ. एस. जे. गावित आणि डॉ. एस. बी. आगळे यांनी परिश्रम घेतले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात महात्मा जोतिबा फुले यांची १९८ वी जयंती उत्साहात साजरी









**दि. ११ एप्रिल, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे कुलगुरु डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. नानासाहेब पवार सभागृहात महात्मा जोतिबा फुले यांची १९८ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे ज्येष्ठ साहित्यिक व प्रसिद्ध व्याख्याते प्राचार्य डॉ. प्रदीप कदम उपस्थित होते. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे होते. यावेळी कुलसचिव डॉ. नितीन दानवले, कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. कैलास कांबळे, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना तथा विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महावीरसिंग चौहान व क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी उपस्थित होते. यावेळी डॉ. साताप्पा खरबडे आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात म्हणाले की महात्मा फुलेंनी भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. त्याद्वारे त्यांनी संपूर्ण देशाला शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांना त्यांनी वाचा फोडली. सत्यशोधक समाजाची निर्मिती केली.

समाजातील विषमता दूर करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. स्वातंत्र्य, समता व बंधुत्व याद्वारे राष्ट्र उभारणीचे मोठे कार्य केले. अशा या महामानवाचे विचार आपण आचरणात आणले पाहिजेत. यावेळी डॉ. प्रदीप कदम आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की शेतकऱ्यांना बी–बियाणे, अवजारे दिली पाहिजेत, शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळाला पाहिजे, शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली पाहिजे असे म्हणणारे पहिले समाजसुधारक म्हणजे क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले हे होते. सर्वांना शिक्षणाची गरज आहे असे म्हणणारे व त्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावणारे थोर समाजसुधारक होते. क्रांती ही कृतीने होत असते हा दृष्टीकोन देणारे ते पहिले तत्वज्ञ होते. सार्वजनिक सत्यधर्माची संकल्पना त्यांनी मांडली. पुण्याचे आयुक्त म्हणून काम करतांना त्यांनी पुण्यातील सर्व पेठांमध्ये शाळा सुरु केल्या. यासारख्या महापुरुषांचा सकारात्मक दृष्टीकोन आपल्या आचरणात आणणे ही खरी क्रांती होय. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. महाविरसिंग चौहान यांनी केले. डॉ. कैलास कांबळे यांनी कवितेद्वारे आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद उबाळे यांनी तर आभार डॉ. विलास आवारी यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी तसेच पदव्युत्तर महाविद्यालय, सावित्रीबाई फुले प्राथमिक विद्यालयाचे विद्यार्थी व विद्यार्थींनी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्साहात साजरी






**दि. १४ एप्रिल, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे संचालक, राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी कल्याण अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयातील डॉ. अण्णासाहेब शिंदे सभागृहात महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख होते. यावेळी या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन जेष्ठ साहित्यीक ॲड. अनंत खेळकर उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक तथा विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महाविरसिंग चौहान, मुर्तीजापूर जि. अकोला येथील कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्री. दिवाकर गवांदे व क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी उपस्थित होते. यावेळी कुलगुरु डॉ. शरद गडाख आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शिक्षण घेतांना विविध अडचणी आल्या. त्यांच्या पदव्यांवर जर एक नजर टाकली तर आपल्या लक्षात येईल की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विद्वत्ता किती महान होती. अशा या महामानवाने शेतकऱ्यांसाठीदेखील खुप महत्वाचे असे कार्य केले आहे. यामध्ये लहान शेतकऱ्यांच्या अडचणी व व्यथेंवर मार्ग सुचविले. शेतजमिनींचे राष्ट्रीयकरण, सिंचन व शेतीसाठी कर्ज योजना, कृषि शिक्षणावर भर असे त्यांचे मोठे योगदान आहे. याप्रसंगी ॲड. अनंत खेळकर आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट पाहिल्यानंतर आपल्या असे लक्षात येते की विद्येच्या व ज्ञानाच्या बळावर एखादी व्यक्ती देशाचे भविष्य उज्वल करु शकते. डॉ. आंबेडकरांनी उठा, शिका व ज्ञानी व्हा असा जो मंत्र सर्वांना दिला तो प्रत्येकाने गांभीर्याने घ्येण्याची गरज आहे. एकमेकांना मदत करा, मातृभाषेचा सन्मान करा, कुणाचीही निंदा नालस्ती करु नका, वेळ व्यर्थ वाया घालवू नका. या कार्यक्रमाचे स्वागत, प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. महाविरसिंग चौहान यांनी करुन दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिव्या साठे हिने तर आभार डॉ. विलास आवारी यांनी मानले. या कार्यक्रमासाठी उपकुलसचिव (प्रशासन) विजय पाटील, आंतरविद्याशाखा जलसिंचन विभाग प्रमुख डॉ. विजय पाटील, प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे, अधिकारी, कर्मचारी व पदव्युत्तर, कृषि अभियात्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी, विद्यार्थींनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मफुकृवि ई वार्ता
एप्रिल २०२५



## राष्ट्रीय पातळीवरील तंत्रज्ञान स्पर्धा तिफनचा कृषि विद्यापीठात उत्साहात प्रारंभ






**दि. २६ एप्रिल, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व सोसायटी ऑफ ऑटोमोटीव्ह इंजिनियर्स, इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय पातळीवरील तंत्रज्ञान तिफन-२०२५ या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ट्रॅक्टरचलीत भाजीपाला पूर्नलागवड यंत्रे या विषयावरील या स्पर्धेचे उद्घाटनप्रसंगी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख होते. याप्रसंगी या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सोसायटी ऑफ ऑटोमोटिव्ह इंजिनियर्स, इंडियाचे अध्यक्ष डॉ. नागराजन गोविंदन उपस्थित होते. यावेळी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रवींद्र बनसोड, कंपनीचे प्रॉडक्ट डिझाईनचे प्रमुख श्री. विवेक जोशी, कस्टमर सपोर्ट आणि मार्केटिंग विभागाचे प्रमुख श्री. राजेश लिंगमपल्ली, कमिंस इंडिया लिमिटेडचे संचालक डॉ. अमोल रेलकर, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. नितीन दानवले, जॉन डियरच्या अभियांत्रिकीच्या ग्रुप मॅनेजर श्रीमती राखी चांडक, जॉन डीअरचे अवजारे विभाग प्रमुख श्री. संदीप अवसारे, कार्यक्रमाचे संयोजक श्री. संदीप राजपूत, अल्टर कंपनीचे प्रमुख बी. एस. रमेशा उपस्थित होते. यावेळी कुलगुरू डॉ. शरद गडाख मार्गदर्शन करतांना म्हणाले की आपल्या देशात ३५% ते ४५% टक्के यांत्रिकीकरण आहे. जपानमध्ये ९५% तर चायना मध्ये ७५ % यांत्रिकीकरण आहे. इतर देशांशी तुलना केल्यास आपल्या देशात यांत्रिकीकरणाला मोठा वाव आहे. प्रगत राष्ट्रांमध्ये शेतकरी कमी आणि जमीन धारणा जास्त असल्याने तेथे शेतीसाठी मोठे यंत्रे विकसित झाले आहे. आपल्या देशात छोटे व अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या जास्त असल्याने त्यांच्या गरजेनुसार छोटे यंत्र व अवजारे विकसित करणे आवश्यक आहे. याचबरोबर बहुउद्देशीय यंत्रे, बॅटरीवर व सौर उर्जेवर चालणारी यंत्रे विकसित करणे आवश्यक आहे. तिफन ही स्पर्धा विद्यार्थ्यांच्या कृषि यंत्र निर्मितीमध्ये कल्पकतेला चालना देणारी आहे. आपल्या देशात शेतीमध्ये यांत्रिकीकरणाला वीस वर्षांपूर्वी सुरुवात झाली. आता यात प्रचंड बदल झाले असून यांत्रिकीकरणाला कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन आणि रोबोटिक्सची साथ मिळाली आहे. भविष्यातील शेती ही ए आय आणि आधुनिक यंत्रावर आधारित असणार आहे. यावेळी डॉ. नागराजन गोविंदन मार्गदर्शन करतांना म्हणाले की आजकाल पदवी शिक्षणासाठी विद्यार्थ्यांचा कल आयटी आणि रोबोटिक्स कडे जास्त आहे. परंतु मेकॅनिकल आणि इलेक्ट्रिक इंजीनियरिंग हा खरा मूलभूत अभियांत्रिकीचा पाया आहे. या शाखेंना अधिक प्रोत्साहन देण्यासाठी देशातील प्रत्येक इंडस्ट्रीने मेकॅनिकल आणि इलेक्ट्रिक कॉलेज दत्तक घेणे गरजेचे आहे. सोसायटी ऑफ ऑटोमॅटिक इंजिनियर्स ऑफ इंडिया या संस्थेने सुरू केलेली राष्ट्रीय पातळीवरील तिफन ही स्पर्धा विद्यार्थ्यांच्या बुद्धी कौशल्यात वाढ करणारी असल्याचे यावेळी ते म्हणाले.

याप्रसंगी डॉ. रवींद्र बनसोड, श्री. विवेक जोशी, श्री. राजेश लिंगमपल्ली, डॉ. अमोल रेलकर, श्रीमती राखी चांडक यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तिफनचे संयोजक श्री. संदीप राजपूत यांनी केले. या स्पर्धेचे हे सातवे वर्ष असून या स्पर्धेचा विषय ट्रॅक्टरचलीत किंवा स्वयंचलीत भाजीपाला पूर्नलागवड यंत्रे हा आहे. सदर स्पर्धेसाठी देशातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयातील ६६ संघ सहभागी झाले होते. त्यातील अंतीम फेरीसाठी नऊ राज्यातून ३६ संघाची अंतीम फेरीमध्ये निवड झालेली आहे. यामध्ये पंजाब राज्यातील चार संघ, तामिळनाडू राज्यातील पाच संघ, मध्यप्रदेश तीन संघ, केरळा, तेलंगणा व दिल्ली प्रत्येकी एक संघ व महाराष्ट्रातून २१ संघ असे एकुण ३६ संघ सहभागी झालेले आहे. तीन दिवस चालणार्या या स्पर्धेत अंतिम ३६ संघानी बनविलेल्या ट्रॅक्टरचलीत भाजीपाला पूर्नलागवड यंत्रांच्या पाच वेगवेगळ्या सेक्शनमध्ये चाचण्या होणार असून त्यानंतर प्रत्यक्ष शेतावरती देखील या यंत्रांची परिक्षा घेतली जाणार असल्याचे कृषि यंत्रे व शक्ती विभाग प्रमुख डॉ. सचिन नलावडे व संयोजक श्री. संदीप राजपूत यांनी सांगितले. या अंतिम फेरीत ३६ संघातील स्पर्धेसाठी एकुण ७५०

विद्यार्थी व विद्यार्थीनी आणि ५० पेक्षा जास्त मार्गदर्शक सहभागी झालेले आहेत. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कृषि यंत्रांची गुणवत्ता तपासण्यासाठी राष्ट्रीय पातळीवरील ३० पंचांची नेमणूक करण्यात आलेली आहे. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विविध विभागांचे विभाग प्रमुख डॉ. वीरेंद्र बारई, डॉ. शैलेंद्र गाडगे, डॉ. विक्रम कड आणि प्राध्यापक व कर्मचारी तसेच संयोजक कमिटीचे पदाधिकारी रोहन जगदाळे, शितल कोलते, पराग चौधरी, सुशांत कदम, शिवानी खंडार, संदीप, ऋषिकेश शिंदे, कुलदीप सिंगल, अजय अग्रवाल इत्यादी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जॉन डीअर कंपनीच्या कृपाली पूर्वीया व गायत्री पाटील यांनी केले तर आभार रोहन जगदाळे यांनी मानले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात तिफन २०२५ कार्यक्रम संपन्न





**दि. २७ एप्रिल, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व सोसायटी ऑफ ऑटोमोटिव्ह इंजिनियर्स, इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय पातळीवरील तंत्रज्ञान तिफन २०२५ या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तीन दिवसांपासून सुरू असलेल्या ट्रॅक्टरचलित भाजीपाला पुनरलागवड यंत्रे या विषयावरील या स्पर्धेचा समारोपप्रसंगी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जॉन डियर प्रा. लिमिटेडचे कार्पोरेट अफेयर्सचे संचालक श्री. मुकुंद वार्ष्णेय होते. याप्रसंगी या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सोसायटी ऑफ ऑटोमोटिव्ह इंजिनियर्स इंडियाचे अध्यक्ष डॉ. गोविंदराज नागराजन उपस्थित होते. यावेळी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रवींद्र बनसोड, कमिन्सचे अध्यक्ष श्री. अभिजीत फडके, सोसायटी ऑफ ऑटोमोटिव्ह इंजिनियर्स इंडियाचे श्री. अजय अग्रवाल, सोसायटी ऑफ ऑटोमोटिव्ह इंजिनियर्स इंडियाचे ऑफ हायवे अध्यक्ष डॉ. कृष्णांत पाटील, श्री.रवींद्र सिंग, कार्यक्रमाचे संयोजक श्री. संदीप राजपूत व अल्टेर कंपनीचे प्रमुख श्री.बी. एस. रमेशा उपस्थित होते.

यावेळी श्री. मुकुल वार्ष्णेय मार्गदर्शन करतांना म्हणाले की भारतातील कृषि अभियंते हे जगामध्ये सर्वोच्च स्थानी असून इतर शाखेच्या अभियंत्यांपेक्षा ते सरस कामगिरी करीत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच रिमोट सेन्सर्स या तंत्रज्ञानाचा उपयोग सर्व क्षेत्रात होताना दिसत आहे. या तंत्रज्ञानाचा उपयोग कृषि क्षेत्रामध्ये जर केला तर भारतीय शेतीमध्ये अमुलाग्र बदल होतील. तिफन स्पर्धेमधील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या यंत्रांमुळे शेतकऱ्यांचे जीवन सुसह्य होईल. यावेळी डॉ. गोविंदराज नागराजन आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी बनवलेले डिझाईन तसेच नवकल्पना या शेतकऱ्यांच्या फायद्याच्या आहेत. सध्याचे हे युग नवीन तंत्रज्ञानाचे असून ड्रोन तंत्रज्ञानामुळे शेतीमधील कठीण कामे सुलभ होतील. या स्पर्धेत भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना त्यांचा दृष्टिकोन, त्यांच्यामध्ये असलेले कौशल्य तसेच ज्ञानामुळे विविध कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याबरोबरच त्यांना स्टार्टअपच्याही संधी उपलब्ध होतील हेच तिफन २०२५ या स्पर्धेचे यश आहे. यावेळी डॉ. रवींद्र बनसोड, डॉ. कृष्णांत पाटील, श्री अभिजीत फडके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री. संदीप राजपूत यांनी तिफन २०२५ च्या प्रवासाविषयी माहिती दिली. यावेळी या तिफन २०२५ या स्पर्धेतील विविध पारितोषिकांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये प्रथम विजेता संघ ठरला पुणे येथील पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालयाचा संघ यांना रु. १,००,०००/- आणि सन्मानचिन्हे देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. पहिल्या उपविजेतेपदाचे बक्षीस रु. ७५,०००/- संगमनेर येथील अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संघास सन्मानचिन्हे देऊन गौरविण्यात आले. द्वितीय उपविजेतेपदाचे बक्षीस रु. ५०,०००/- लुधियाना येथील पंजाब कृषि विद्यापीठाचा संघ व पुणे येथील सिंहगड

अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संघास विभागून देण्यात आले. यावेळी विविध ८ प्रकारातील (मार्केटिंग, डिझाईन, किफायतशीर, कार्यक्षम व इतर) विजेत्या संघास मान्यवरांच्या हस्ते रोख रु. २५०००/– ची पारितोषिके आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले तसेच या स्पर्धा यशस्वी करण्यामध्ये सहभागी सदस्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी या स्पर्धेसाठी प्रायोजक म्हणून काम केलेल्या विविध कंपन्यांना मान्यवरांच्या हस्ते मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी डॉ. कृष्णांत पाटील यांनी पुढील वर्षी होणाऱ्या तिफन २०२६ या स्पर्धेचे समन्वयक म्हणून शितल कोलते व सहसंयोजक म्हणून श्री. रोहन जगदाळे यांच्या नावाची घोषणा केली. या कार्यक्रमासाठी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विविध विभागांचे विभाग प्रमुख, प्राध्यापक व कर्मचारी तसेच संयोजक कमिटीचे पदाधिकारी पराग चौधरी, सुशांत कदम, संदीप बुरली, ऋषिकेश शिंदे, कुलदीप सिंगल, अजय अग्रवाल, विनयकुमार इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवानी खंडार व यशोदा भणगे यांनी तर आभार कृषि यंत्र व शक्ती विभाग प्रमुख डॉ. सचिन नलावडे यांनी मानले.

## रवांडा देशाच्या अभियंत्यांची महात्मा फुले कृषि विद्यापीठास भेट




**दि. ६ एप्रिल, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा फुले कृषि विद्यापीठात केंद्र सरकारच्या राष्ट्रीय जल अकादमीच्या नेतृत्वाखाली रवांडा देशाच्या १० अभियंत्यांच्या दोन दिवसीय भेटीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. जी . के. ससाणे, राष्ट्रीय जल अकादमीचे संचालक श्री. मिलिंद पानपट्टी, कृषि अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. सुनील कदम, कृषि अभियांत्रिकी विभागाचे माजी प्रमुख डॉ. मुकुंद शिंदे ,आंतरविद्या शाखेचे विभाग प्रमुख डॉ. विजय पाटील, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे डॉ.आनंद चवई, विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. भगवान देशमुख आणि सेंटर ऑफ एक्सलन्सचे संशोधन सहयोगी उपस्थित होते.

यावेळी डॉ. गोरक्ष ससाणे यांनी राहुरी कृषि विद्यापीठाच्या शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षणाबद्दल माहिती दिली. भेटी दरम्यान कृषि अभियांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख आणि सेंटर ऑफ एक्सलन्सचे प्रकल्प प्रमुख डॉ.सुनील कदम यांनी कृषि विद्यापीठात कार्यरत असलेल्या काटेकोर शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञानावर सेंटर ऑफ एक्सलन्स प्रकल्पाविषयी आणि आयओटी सक्षम सिंचन वेळापत्रक याविषयी, डॉ. वैभव मालूजकर आणि इंजि. अभिषेक दातीर यांनी प्रकल्पाच्या प्रक्षेत्रावर ठिबक व तुषार सिंचन प्रणाली आणि त्यांचे मूल्यांकन याविषयी प्रात्यक्षिकांसह, डॉ. आनंद चवई यांनी कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राविषयी, डॉ. विजय पाटील यांनी इरिगेशन पार्क याविषयी, डॉ. डी. डी. खेडकर यांनी फिल्टरची देखभाल आणि ऑपरेशन याविषयी, इंजि. तेजश्री नवले यांनी फुले ऑटो इरिगेशन शेड्युलर, फुले मृदा संवेदक आधारित सिंचन वेळापत्रक प्रणाली, स्मार्ट फुले इरिगेशन शेड्युलर इत्यादी आयओटी सक्षम सिंचन प्रणाली विषयी सविस्तर माहिती आणि प्रात्यक्षिक दिले. फुले स्मार्ट हवामान केंद्र आणि हायपरस्पेक्टर इमेजिंगचा शेतीसाठी वापर याविषयी सविस्तर माहिती डॉ. वैभव मालुंजकर यांनी दिली.

शेतीसाठी ड्रोन आणि रोबोटिक्स तंत्रज्ञानाचा वापर तसेच ड्रोनचे प्रात्यक्षिक डॉ. गिरीशकुमार भनगे यांनी दिले तर आयटी पार्क याविषयी सविस्तर माहिती डॉ. शुभांगी घाडगे यांनी दिली. यावेळी रवांडा येथील अभियंता म्हणाले की राहुरी कृषि विद्यापीठात

सूक्ष्मसिंचनामधील आय.ओ.टी., शेतीमधील ड्रोन तंत्रज्ञान व इत्यादी तंत्रज्ञानामध्ये चांगले संशोधन झाले आहे. या पद्धतीचे तंत्रज्ञान आम्ही आमच्या देशात राबविण्याचा प्रयत्न करणार आहोत. या दोन दिवसीय भेटीचे नियोजन डॉ.सुनील कदम, डॉ. विजय पाटील आणि डॉ. भगवान देशमुख यांनी केले.

## कृषि विद्यापीठाच्या उद्यानविद्या विभागाच्या प्रक्षेत्रावरील आंब्याला मिळाला उच्चांकी दर







**दि. १२ एप्रिल, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील उद्यानविद्या विभागाच्या प्रक्षेत्रावरील आंबा बागेतील फळांच्या विक्रासाठी महाटेंडर प्रणालीद्वारे प्रक्रिया राबविण्यात आली. त्यानुसार फळझाडांची लिलाव प्रक्रिया पार पडली. त्यामध्ये यावर्षी रु. ७१.०० लाख इतका उच्चांकी दर मिळाला आहे. सदर प्रक्षेत्रावरील आंबा बागेमध्ये ३०७१ इतकी उत्पादनक्षम झाडे असुन त्यामध्ये केशर, लंगडा, हापुस, वनराज, तोतापुरी, रत्ना, सिंधू, मल्लीका, दुधपेडा, निलम, आम्रपाली, पायरी इ. वाणांची फळझाडे आहेत. यामध्ये यंदा मागील वर्षाच्या तुलनेत आंबा फळापासुन मिळणाऱ्या महसुलामध्ये दुपटीने वाढ झाली आहे. विद्यापीठातील आंबा फळे ही चव व गुणवत्तेसाठी महाराष्ट्रात प्रसिदध आहेत. त्यामुळे विद्यापीठातील आंबा फळबागा घेण्यासाठी व्यापार्यांचा यावर्षी चांगला प्रतिसाद मिळाला. यावर्षी हवामानाची मिळालेली साथ व संबंधीत विभागाने प्रक्षेत्रावरील आंबा फळबागांचे एकदाच आलेल्या मोहराचे केलेले सुयोग्य व्यवस्थापन या बाबी कारणीभुत ठरल्या आहेत. विद्यापीठातील आंबा बागांचे बारमाही व्यवस्थापन हे तांत्रीक व शास्त्रोक्त पदधतीने केले जाते. याबाबत विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के आणि उद्यानविद्या विभागाचे विभाग प्रमुख डॉ. भरत पाटील यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. उद्यानविद्या प्रक्षेत्राचे प्रभारी अधिकारी डॉ. सचिन मगर यांच्या आंबाबागेच्या सुयोग्य व्यवस्थापनामुळे यावर्षी फळधारणा दुप्पट झाली असून मागील दहा वर्षाचा उत्पन्नाचा उच्चांक गाठला आहे. आंबा फळबागेचे वेळेत योग्य व्यवस्थापन तसेच अधिक उत्पादन वाढीसाठी उद्यानविद्या प्रक्षेत्राचे प्रभारी अधिकारी डॉ. सचिन मगर, तसेच त्यांचे सहकारी श्री. विजय पवार, श्री. राहुल पाटील, श्री. वसंत बाचकर, श्री. बाबासाहेब होडगर, श्री. सचिन शेळके, श्री. रमेश अनाप, श्री. पुंजाहरी बाचकर, श्री. दिपक पवार व उद्यानविद्या विभागाचे सर्व कर्मचारी यांनी विशेष परीश्रम घेतले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाला आंबा विक्रीतून मिळाले १ कोटी ८४ लाखाचे विक्रमी उत्पन्न

**दि. १८ एप्रिल, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील बियाणे विभाग व उद्यानविद्या विभागाच्या रोपवाटिकेच्या प्रक्षेत्रावरील आंबा फळांच्या लिलावातून विक्रमी १ कोटी ८४ लाखाचे उत्पन्न विद्यापीठाला मिळाल्याची माहिती बियाणे विभागाचे प्रमुख तथा कुलसचिव डॉ. नितीन दानवले यांनी दिली. बियाणे विभागाच्या प्रक्षेत्रावरील अ/ब विभाग, मध्यवर्ती रोपवाटिका, ई विभाग प्रक्षेत्र यावरील ६,१२६ झाडे व उद्यानविद्या विभागांतर्गत असलेल्या रोपवाटिकेच्या प्रक्षेत्रावरील ३,०७१ झाडे यांची केशर, लंगडा, वनराज, तोतापुरी या आंबा फळ वाणांची ई–निविदा प्रणालीने विक्री करण्यात आली. बियाणे विभागांतर्गत असलेल्या प्रक्षेत्रावरील झाडांपासून १ कोटी १३ लाख व उद्यानविद्या विभागाच्या रोपवाटिकेतील आंबा फळझाडांपासून ७१ लाख असे एकूण १ कोटी ८४ लाखांचा महसूल विद्यापीठाला मिळाला आहे. विद्यापीठाकडील आंबा चवीष्ट व गुणवत्तापूर्ण असल्यामुळे मुंबई, ठाणे, पालघर येथील व्यापाऱ्यांनी खरेदीसाठी मोठा प्रतिसाद नोंदवला. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांचे मार्गदर्शनाखाली व बियाणे विभागाचे प्रमुख







तथा कुलसचिव डॉ. नितीन दानवले यांच्या नियोजनात सर्व प्रभारी अधिकारी यांनी योग्य वेळेत खते, औषध फवारणी, व फळधारणेच्या काळात योग्य पाण्याची व्यवस्था केल्यामुळे झाडांना चांगल्या प्रकारची फळधारणा दिसून आली. त्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात व्यापाऱ्यांची आंबा बागा खरेदीसाठी चढाओढ निर्माण झाली. विद्यापीठाचे नियंत्रक श्री. सदाशिव पाटील यांनी ई– निविदा उघडताना योग्य त्या लेखासंहितेचा अवलंब करून अचूक मार्गदर्शन केले. डॉ. नितीन दानवले यांच्या नियोजनाखाली मध्यवर्ती रोपवाटिका प्रभारी अधिकारी प्रा. मंजाबापू गावडे, ई विभागाचे प्रभारी अधिकारी प्रा.एस.व्ही पाटील व अ/ब विभागाचे प्रभारी अधिकारी श्री. प्रवीण बन तसेच उद्यानविद्या विभागांतर्गत असलेल्या रोपवाटिकेचे प्रमुख डॉ. सचिन मगर यांनी आंबा फळ उत्पादनात वाढ करण्यासाठी प्रयत्न केले. आंबा फळांची योग्य वेळेत विक्री होण्यासाठी प्रा. बी.टी. शेटे, डॉ. के.सी. गागरे, डॉ. रश्मी भोगे, डॉ. माने, श्री. अभिजीत सांगळे, सौ. संगीता माने व श्री. संदीप कोकाटे यांनी योग्य व अचूक नियोजन केले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात विभागस्तरीय खरीप हंगामापूर्व कार्यशाळा २०२५–२६ चे आयोजन






**दि. २८ एप्रिल, २०२५.** राज्याचा कृषि विभाग व महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने विभागस्तरीय दोन दिवसीय खरीप हंगाम पूर्व कार्यशाळा २०२५–२६ चे आयोजन महात्मा फुले कृषि विद्यापीठातील डॉ. नानासाहेब पवार सभागृहात करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख होते. याप्रसंगी राज्याच्या कृषि विभागाचे प्रधान सचिव श्री. विकासचंद्र रस्तोगी यांनी अधिकाऱ्यांशी ऑनलाईन संवाद साधला. यावेळी व्यासपीठावर राज्याचे कृषि आयुक्त श्री. सुरज मांढरे, विस्तार व प्रशिक्षण संचालक श्री. रफिक नाईकवाडी, आत्मा संचालक श्री. अशोक किरनाळे, कृषि प्रक्रिया व नियोजन संचालक श्री. विनयकुमार आवटे, निविष्ठा व गुणनियंत्रण संचालक श्री. सुनील बोरकर, कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, कुलसचिव डॉ. नितीन दानवले, विभागीय कृषि सहसंचालक, पुणे श्री. दत्तात्रय गवसाने, विभागीय कृषि सहसंचालक नाशिक श्री. सुभाष काटकर, विभागीय कृषि सहसंचालक, कोल्हापूर

श्री. अजय कुलकर्णी, विभागीय कृषि सहसंचालक श्रीमती मेघना केळकर व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. सुधाकर बोराळे उपस्थित होते.

याप्रसंगी कुलगुरू डॉ. शरद गडाख अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना म्हणाले की महाराष्ट्र शासनाचा कृषि विभाग व राज्यातील सर्व कृषि विद्यापीठे यांच्यातील समन्वय खूप चांगला आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठात शेतकरीभिमुख संशोधन सुरू आहे. या दोन दिवसीय खरीप हंगाम पूर्व कार्यशाळेमध्ये महत्त्वाच्या विविध १० घटकांवर कृषि विभागाच्या अधिकाऱ्यांसाठी प्रत्यक्ष कृतीद्वारे प्रशिक्षण आयोजित केल्यामुळे खऱ्या अर्थाने या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यापीठाचे तंत्रज्ञान निश्चितपणे शेतकऱ्यांच्या शेतावर पोहोचेल. विद्यापीठातील प्रयोगशाळेमध्ये गुणवत्तापूर्ण जैविक खते, जैविक औषधे तयार केली जातात. ती राज्यातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी कृषि खात्याने सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. येणारा खरीप हंगाम चांगला होईल. पाऊसाचा अंदाजही चांगला असून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल व शेतकरी सुखी होईल असा आशावाद त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या उद्घाटन कार्यक्रमानंतर ऑनलाइन पद्धतीने राज्याचे कृषि सचिव श्री. विकासचंद्र रस्तोगी मार्गदर्शन करतांना म्हणाले की पुणे येथील बैठकीत ठरल्याप्रमाणे विद्यापीठाचे तंत्रज्ञान राज्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठीच्या अभियानाची सुरुवात ही राहुरी कृषि विद्यापीठापासून झाली आहे ही आनंदाची गोष्ट आहे. अशा प्रकारच्या कार्यशाळेचे आयोजन करणे ही खूप चांगली संकल्पना आहे. आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर व पोकरासारख्या प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यातील एक कोटी ७१ लाख शेतकऱ्यांपैकी जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत आपण पोहोचू शकतो. प्रत्येक गावात असणाऱ्या गाव पातळीवरील ग्राम कृषि समित्या यांच्या माध्यमातून प्रात्यक्षिकांचा विस्तार अधिक परिणामकारक होऊ शकतो. कृषि विद्यापीठाने विकसीत केलेले तंत्रज्ञान या कार्यशाळेच्या माध्यमातून, कृत्रिम बुध्दीमत्ता, समाज माध्यमे, प्रिंट माध्यमे राज्यातील दहा हजार पेक्षा जास्त शेतकरी उत्पादक कंपन्यांचे सदस्य शेतकरी व डिजिटल शेतीशाळेच्या माध्यमातून शेवटच्या शेतकऱ्यांपर्यत पोहचू शकते.

यावेळी श्री. सुनील बोरकर, डॉ. विठ्ठल शिर्के, श्री. विनयकुमार आवटे व डॉ. गोरक्ष ससाणे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. दत्तात्रय गवसाणे यांनी केले. या प्रसंगी मातीचा नमुना घेणे, बीज प्रक्रिया मोहीम, घरगुती चाचणी पद्धतीने बियाणे उगवण क्षमता तपासणी मोहीम, फळबाग लागवडीसाठी सी. आर. ए. तंत्रज्ञानाचा वापर, हुमणी कीड एकात्मिक व्यवस्थापन, ऊस लागवडीसाठी रोपे तयार करणे, भात पिकामध्ये युरिया ब्रिकेट्सची उपलब्धता व वापर वाढविणे, बोंड अळी एकात्मिक व्यवस्थापन, शेती शाळा घेणेबाबत व शेतावर जैविक खते तसेच बायोचार निर्मिती या विविध मुद्द्यांवर आधारित प्रत्यक्ष कृतीद्वारे प्रात्यक्षिकांचे आयोजन सभागृहाच्या बाहेर करण्यात आले आहे. या कार्यशाळेत विविध विषयांवर विद्यापीठातील शास्त्रज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यशाळेतील पुणे, नाशिक व कोल्हापूर या विभागातील सर्व उपविभागीय अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, कृषि अधिकारी तसेच मंडल कृषि अधिकारी, कृषि विज्ञान केंद्रातील अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीरामपूरचे तालुका कृषि अधिकारी श्री. उल्हास राक्षे यांनी तर आभार अहिल्यानगरचे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. सुधाकर बोराळे यांनी मानले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात बियाणे उत्पादन आढावा व कृषि विकास समन्वय समितीची बैठक संपन्न

**दि. २९ एप्रिल, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे २२ वी बियाणे उत्पादन आढावा व कृषि विकास कार्यशाळा समन्वय समितीची बैठक महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. ही आढावा बैठक संशोधन संचालक तथा सदस्य सचिव, बियाणे उत्पादन आढाव समिती डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली व कुलसचिव तथा प्रमुख शास्त्रज्ञ (बियाणे) डॉ. नितीन दानवले यांच्या नियोजनाखाली पार पडली. याप्रसंगी नियंत्रक श्री. सदशिव पाटील, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे संशोधन संचालक डॉ. किशोर शिंदे, बियाणे महामंडळ, अकोल्याचे बीज प्रमाणीकरण संचालक डॉ. अंकुश माने, अहिल्यानगर बियाणे विभागाचे डॉ. बी.जी. पाटील, श्री.एन. एम अभंग, श्री. सुनील दौंड, राष्ट्रीय बियाणे महामंडळाचे श्री. नागराज बी. एस., श्री. सौरदीप बोस उपस्थित होते. यावेळी साखर आयुक्त पुणे यांचे प्रतिनिधी श्री. महेश झेंडे हे ऑनलाइन उपस्थित होते.

यावेळी कुलगुरू डॉ. शरद गडाख मार्गदर्शन करतांना म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठाने केंद्र शासनाच्या कृषि कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांनी बीज उत्पादक संस्थांकडून मागणी केल्याप्रमाणे मूलभूत बीजोत्पादन लक्षांकांपेक्षा जास्त करावे. महाबीज, राष्ट्रीय बियाणे महामंडळ व बियाणे उत्पादक खासगी कंपन्या यांची बियाण्यांची गरज भागून उर्वरित बियाणे सत्यप्रत करून शेतकऱ्यांना वितरित करावे. जेणेकरून शेतकऱ्यांना विद्यापीठातील विविध वाणांचे सत्यप्रत बियाणे मोठ्या प्रमाणात उपलब्ध होईल. बैठकीच्या सुरुवातीला डॉ. नितीन दानवले यांनी बियाणे विभागाचा संक्षिप्त आढावा सादर केला. यावेळी त्यांनी २१ व्या आढावा बैठकीच्या इतिवृत्तावरील कार्यवाही




अहवाल व मागील वर्षी बियाणे विभागातर्फे राबविण्यात आलेल्या कार्यक्रमांचे सादरीकरण केले. बीज उत्पादन अधिकारी डॉ. कैलास गागरे यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध शेतपिकांच्या बीज उत्पादन कार्यक्रमांचे सादरीकरण केले. डॉ. ज्ञानेश्वर क्षीरसागर यांनी भाजीपाला बीज उत्पादन व डॉ. सचिन मगर यांनी फळ पिकांच्या रोपे उपलब्धीचे सादरीकरण केले. याप्रसंगी डॉ. राजेंद्र भिलारे यांनी विद्यापीठांतर्गत राबविण्यात येत असलेल्या ऊस बिजोत्पादन त्याचप्रमाणे डॉ. अण्णासाहेब नवले, डॉ. उत्तम कदम, डॉ. भीमराज कांबळे या विभाग प्रमुखांनी त्यांच्या विभागांतर्गत उत्पादित विविध फळे पिकांच्या रोपांची उपलब्धता, जैविक खते, जैविक औषधे, सूक्ष्म अन्नद्रव्ये तसेच श्री. समीर पवार यांनी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पायाभूत सुविधांचे सादरीकरण केले. ही आढावा बैठक यशस्वी करण्यासाठी प्रा. बी.टी. शेटे, डॉ. अनिल सूर्यवंशी, डॉ. अविनाश कर्जुले, श्री. बी.जी. राठोड, श्री. आदिनाथ ढगे, श्री. संदीप कोकाटे व बियाणे विभागातील सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या आढावा बैठकीचे सूत्रसंचालन बियाणे विपणन अधिकारी डॉ. दिलीप ठाकरे यांनी केले.

## हाळगाव कृषि महाविद्यालयात जागतिक आरोग्य दिन साजरा





**दि. ८ एप्रिल, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक आरोग्य दिनानिमित्त वैद्यकीय तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमास विद्यार्थी परिषद उपाध्यक्ष डॉ. दत्तात्रय सोनवणे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. पोपट पवार, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी, डॉ. प्रेरणा भोसले, डॉ. गोकुळ वामन, डॉ. मनोज गुड, वैद्यकीय अधिकारी डॉ. दिपक वाळुंजकर, सहाय्यक ग्रंथपाल श्री. महादू शिंदे, शारीरिक शिक्षण निर्देशक श्री.अविनाश हांडाळ, मिश्रक श्री. शशिकांत कांबळे उपस्थित होते. जामखेड तालुका आरोग्य अधिक्षक डॉ. सुनील बोराडे, अरणगाव प्राथमिक आरोग्य केंद्र वैद्यकीय अधिक्षक डॉ. सचिन रेडे, डॉ. अजिंक्य धाडगे, डॉ. संजीवनी बारस्कर, आरोग्य निरीक्षक श्री. सुधाकर राख, आरोग्यसेवक श्री. राजेंद्र बांगर, आरोग्यसेविका श्रीमती राणी नागरगोजे, श्रीमती आशा हाजाराबी शेख, मदतनीस श्रीमती रक्साना सय्यद, महालॅब टेक्निशिअन श्री. सुरेश यादव व श्री. अमोल नागवडे यांच्या पथकाने वैद्यकीय तपासणी केली.

महाविद्यालयातील विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी यांची वैद्यकीय तपासणी करून विविध रक्त चाचण्यांसाठी रक्त नमुने घेण्यात आले. यावेळी दैनंदिन जीवनात संतुलित आहार, योग, व्यायामाचे महत्व यावर आरोग्य शिक्षण देण्यात आले. सदर शिबिरात रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण, कॅल्शियमचे प्रमाण, थायरॉईड, यकृत व मुत्र पिंडाची कार्य, हृदयरोग तपासणीमध्ये लिपिड प्रोफाईल, रक्तातील साखरेचे प्रमाण अशा विविध प्रकारच्या तपासण्या करण्यात आल्या. या सर्व तपासण्या विद्यार्थ्यांना त्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य संतुलित ठेवण्यासाठी व अधिकारी व कर्मचारी यांचे दैनंदिन आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी फायदेशीर ठरतील. एकूण २५ कर्मचारी व १६० विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. महाविद्यालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. दिपक वाळुंजकर व मिश्रक श्री. शशिकांत कांबळे यांनी शिबिराच्या आयोजनामध्ये विशेष मेहनत घेतली. सदर शिबिरास विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद नोंदवला.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी



**दि. ११ एप्रिल, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय हाळगावचे मा. सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची १९८ वी जयंती साजरी करण्यात आली. महाविद्यालयातील विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष तथा प्राध्यापक कृषि विद्या डॉ. दत्तात्रय सोनवणे यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन केले. याप्रसंगी, डॉ. दत्तात्रय सोनवणे यांनी स्त्री शिक्षणासाठी, शेतकऱ्यांसाठी महात्मा ज्योतीबांनी केलेल्या महान कार्याची आठवण विद्यार्थ्यांना करून दिली. आपल्या विद्यापीठाचे नाव महात्मा ज्योतीबांनी केलेल्या महान कार्याचा गौरव म्हणून ठेवण्यात आले आहे याची जाणीव करून दिली व त्याचे नावलौकीक वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याचे सूचित केले. तसेच विद्यार्थी सुदेश मोरे याने समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनातील निवडक प्रसंग उपस्थितांसमोर मांडून शेतकऱ्यांच्या नेत्याच्या कार्याचा गौरव केला. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी, डॉ. निकीता धाडगे, डॉ. प्रणाली ठाकरे, अर्चना महाजन, डॉ. अंबादास मेहेत्रे, डॉ. संदीप मोरे, संभाजी ठवाळ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## शासकीय कृषि महाविद्यालय हाळगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



**दि. १४ एप्रिल, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय हाळगावचे मा. सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे

यांच्या मार्गदर्शनाखाली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी, महाविद्यालयातील विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष तथा प्राध्यापक कृषि विद्या डॉ. दत्तात्रय सोनवणे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन केले, तसेच इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी प्रतिमेस अभिवादन केले. महाविद्यालयाच्या प्रा. अर्चना महाजन यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्यास उजाळा दिला. डॉ. बाबासाहेबांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली आणि अस्पृश्य लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. भारतीय संविधानाचे शिल्पकार, कायदेमंत्री, तत्वज्ञ, अर्थशास्त्रज्ञ व समाजसुधारक अशी ओळख त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिली. याप्रसंगी विद्यार्थिनी मानसी मोरे हिने आपले मनोगत व्यक्त केले.

## छत्रपती शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुल, काष्टी येथे डिजिटल कृषि अभियानामध्ये युवकांचा सहभाग या विषयावर व्याख्यान संपन्न



**दि. ४ एप्रिल, २०२५.** छत्रपती शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुल, काष्टी येथे डिजिटल कृषि अभियानामध्ये युवकांचा सहभाग या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी कृषि विज्ञान संकुलाचे प्रमुख डॉ. सचिनकुमार नांदगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वरिष्ठ प्राध्यापक व विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. सोमनाथ सोनवणे होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते म्हणुन  नाशिक जिल्हा युवा अधिकारी व जिल्हा राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. रविंद्र अहिरे उपस्थित होते. यावेळी विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. प्रशांत सोनवणे, वस्तीगृहाचे कुलमंत्री डॉ. संजय पाटील, उद्यानविद्या महाविद्यालयाचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी व सहाय्यक प्राध्यापक डॉ. दिनेश बिरारी, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. प्रशांत सोनवणे, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख डॉ. राहुल खुळे, सहाय्यक कुलसचिव श्री. नारायण पाठक, सहाय्यक विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. अमृत खैरे, डॉ. सुदामा काकडे, डॉ. मनोज पटोकार, डॉ. गणेश लहाने,  डॉ. गौरव कचवे, प्रा. स्वागत लाळगे उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. सोमनाथ सोनवणे यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी अंतर्गत कार्यरत डिजिटल कृषि विभागाचे सध्याचे कार्य, कार्यरत विविध मोबाईल ॲप्स तसेच कौशल्य विकास व अनुभवाधीष्टीत प्रशिक्षणासाठी आयोजित योजना ह्याबद्दल माहिती दिली. डॉ. रविंद्र आहिरे यांनी संकुलाचे अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी तसेच विद्यार्थी–विद्यार्थिनीं यांसोबत डिजिटल कृषि अभियानाला यशस्वी करण्यासाठी युवकांचे कर्तव्य याबद्दल विस्तृत मार्गदर्शन केले. डिजिटल कृषि अभियानाचे उद्दिष्ट शेतकरी–केंद्रित डिजिटल आणि कृषिपूरक यंत्रणा स्थापित करणे आहे, जेणेकरून सरकारी कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता येईल आणि कार्यक्षमता वाढेल. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी वास्तववादी धोरण तयार करण्यासाठी मदत होईल व कृषि योजना प्रभावी पद्धतीने पोहचवता येतील. यासाठी युवकांनी मायभारत पोर्टलवर नोंदणी करावी तसेच जास्तीत जास्त शेतकऱ्यापर्यंत ही माहिती पोहोचवावी असे आवाहन मुख्य व्याख्याते डॉ. रविंद्र आहिरे यांनी केले. वसतिगृहाचे कुलमंत्री डॉ. संजय पाटील यांनी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम व आधुनिक शिक्षण प्रणाली यांचे कृषि आधुनिकीकरणामधील योगदान व भविष्यकालीन अपेक्षित कार्य याबद्दल चर्चा केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रशांत सोनवणे यांनी केले. या प्रसंगी कृषि महाविद्यालयाचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी व इतर प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी–विद्यार्थीनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. अमृत खैरे यांनी तर डॉ. राहुल खुळे यांनी आभार मानले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे महात्मा ज्योतिराव फुले जयंती साजरी




**दि. ११ एप्रिल, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे डॉ. रमेश चौधरी, डॉ. बाळासाहेब रोमाडे, डॉ. कुशल ढाके, डॉ. तुषार भोसले, डॉ. रवींद्र जाधव, डॉ. सागर पाटील, डॉ. मनीषा पालवे, डॉ. सागर पाटील, श्री. जयदीप बोरसे उपस्थित होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे डॉ. दत्तात्रय पाचरणे सहयोगी प्राध्यापक यांनी आपल्या भाषणात महात्मा फुले यांच्या जीवन कार्यास उजाळा दिला. महात्मा ज्योतिराव फुले यांनी महिला आणि अल्पसंख्याकांसाठी शिक्षणासाठी कार्य केले. ते केवळ एक कार्यकर्ते नव्हते तर एक लोकप्रिय भारतीय विचारवंत, लेखक आणि सुधारक देखील होते. ज्योतिबा फुले यांचे जीवन आणि त्यांचे विचार आणि महान कार्य आजही लोकांसाठी प्रेरणास्त्रोत आहेत. त्यांचे 'गुलामगिरी' हे पुस्तक आजही क्रांतिकारक मानले जाते. तुम्ही एखाद्या पुरूषाला शिक्षित केले तर तुम्ही एका माणसाला शिक्षित करता. पण जर तुम्ही एका महिलेला शिक्षित केले तर तुम्ही संपूर्ण कुटुंबाला शिक्षित करता असेही डॉ. पाचरणे म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रथमेश कांबळे याने तसेच आभार प्रदर्शन कु. अश्विनी पाटील हिने केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनाच्या स्वयंसेवकांनी तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, श्री. नामदेव धुर्वे आणि सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुशल ढाके यांनी परिश्रम घेतले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठी उत्साहात साजरी



**दि. १४ एप्रिल, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे डॉ. तुषार भोसले, श्री. जयदीप बोरसे, श्री. संतोष गवई उपस्थित होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. कुशल ढाके सहाय्यक प्राध्यापक यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यास उजाळा दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्त्वज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली आणि अस्पृश्य (दलित) लोकांविरुद्ध होणारा सामाजिक

वर्ष :५, अंक क्रं. : ५२, एप्रिल, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली, तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. ते ब्रिटिश भारताचे मजूरमंत्री, स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार होते. देशाच्या विविध क्षेत्रांत दिलेल्या योगदानामुळे त्यांना आधुनिक भारताचे शिल्पकार किंवा आधुनिक भारताचे निर्माते म्हणतात असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. तुषार भोसले यांनी तर आभार प्रदर्शन श्री. जयदीप बोरसे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी श्री. नामदेव धुर्वे आणि सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुशल ढाके यांनी परिश्रम घेतले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती तसेच महात्मा बसवेश्वर जयंती साजरी





**दि. ३० एप्रिल, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे डॉ. सागर बंड, डॉ. रवींद्र जाधव, श्री. संतोष गवई उपस्थित होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे सहाय्याक प्राध्यापक डॉ. रियाज शेख यांनी आपल्या भाषणात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि महात्मा बसवेश्वर यांच्या जीवन कार्यास उजाळा दिला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज एक प्रसिद्ध संत, भक्त, कवी आणि समाजसुधारक होते. त्यांनी अंधश्रद्धा आणि जातीभेदाच्या विरोधात काम केले. त्यांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून समाजात समता, बंधुता आणि सर्वधर्म समभावाची शिकवण दिली. त्यांचे कार्य इतके मोठे होते की भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी त्यांना 'राष्ट्रसंत' ही पदवी दिली. ते केवळ एक संत नव्हते तर ते एक समाजसुधारक आणि राष्ट्रभक्त म्हणूनही ओळखले जातात असे डॉ. शेख म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सागर बंड यांनी तसेच आभार प्रदर्शन डॉ. रवींद्र जाधव यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी श्री. नामदेव धुर्वे आणि सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुशल ढाके यांनी परिश्रम घेतले.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे अंतर्गत कृषि धान्य महोत्सव संपन्न

**दि. १२ एप्रिल, २०२५.** कृषि विज्ञान केंद्र, धुळे, प्रकल्प संचालक, आत्मा व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने धुळे जिल्ह्यामध्ये शेतकरी उत्पादक कंपन्यांची उत्पादने तसेच शेतकरी कृषि उत्पादनांकरिता कृषि धान्य महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव इल्हे होते. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन धुळे ग्रामीणचे आमदार श्री. राघवेंद्र भदाने उपस्थित होते. यावेळी सामाजिक कार्यकर्त्या सौ. अल्पा अग्रवाल, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. सुरज जगताप, कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. दिनेश नांद्रे, आत्मा प्रकल्प संचालक श्री. हितेंद्र सोनवणे, आत्मा प्रकल्प उपसंचालक श्री. बापू गावीत, श्री. विनय बोरसे, श्री. जगदीश काथेपुरी, डॉ. अतीश पाटील, डॉ. धनराज चौधरी उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शनामध्ये डॉ. बबनराव इल्हे यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठातील संशोधनाविषयी माहिती दिली. विद्यापीठातील संशोधनाचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. श्री. राघवेंद्र भदाने यांनी प्रमुख मार्गदर्शनामध्ये शासन शेतकरीभीमुख राबवित असलेल्या विविध योजना उपक्रमाविषयी माहिती दिली. याप्रसंगी तांत्रिक मार्गदर्शनात डॉ. दिनेश नांद्रे यांनी विक्री व विपणन व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले. यावेळी एकूण ४५ शेतकऱ्यांचा सन्मान आत्मा कार्यालयामार्फत







करण्यात आला. सदर महोत्सवाचे प्रास्ताविक श्री हितेंद्र सोनवणे यांनी केले. याप्रसंगी धान्य महोत्सवात धान्य उत्पादनाचे एकूण २५ स्टॉल उभारण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. विनय बोरसे यांनी केले. यावेळी कृषि विभागाचे सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच शेतकरी, महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे एक दिवसीय कृषि उद्योजकता विकास या विषयावर प्रशिक्षण संपन्न





**दि. २३ एप्रिल २०२५.** कृषि विज्ञान केंद्र, धुळे आणि आत्मा, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे एक दिवसीय कृषि उद्योजकता विकास या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. दिनेश नांद्रे होते. यावेळी डॉ. पंकज पाटील, डॉ. धनराज चौधरी, श्रीमती. अमृता राऊत उपस्थित होते. याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शनामध्ये डॉ.दिनेश नांद्रे यांनी काढणी पश्चात तंत्रज्ञान यावर मार्गदर्शन केले. काढणी पश्चात तंत्रज्ञान यावर महात्मा फुले कृषि विद्यापीठातील संशोधनाविषयी माहिती करून दिली. तांत्रिक मार्गदर्शनामधे डॉ.धनराज चौधरी यांनी कृषि व कृषि पूरक व्यवसाय यामध्ये प्रामुख्याने दुग्ध व्यवसाय या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. श्रीमती. अमृता राऊत यांनी कृषि प्रक्रियेमधील निर्जलीकरण आणि त्याचे महत्व या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच डॉ. पंकज पाटील यांनी कृषिमधील ड्रोन तंत्रज्ञान आणि त्याचे महत्व या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पंकज पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. धनराज चौधरी यांनी तर आभार श्रीमती. अमृता राऊत यांनी मानले. या प्रसंगी कृषि विज्ञान केंद्राचे सर्व विषय विशेषज्ञ उपस्थित होते. तसेच शेतकरी, युवक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मे महिन्यातील कामांचा तपशील

### ऊस

- सुरु ऊसासाठी मेच्या पहिल्या आठवडयात संजीवकांच्या चौथ्या फवारणीसाठी हेक्टरी ३५० लिटर पाणी लागेल. त्याकरिता जी.ए. ३ जिब्रेलिक ॲसीड (४० पीपीएम) १५ ग्रॅम, ६ बी.ए. : ६ बेन्झिल ॲडेनाईन (४० पीपीएम) १५ ग्रॅम, ३७५० ग्रॅम १९:१९:१९, ९३७ ग्रॅम चिलेटेड सुक्ष्म अन्नद्रव्य व १८७५ ग्रॅम सिलिकॉन (सिलिसायलिक ॲसिड) एकत्रित करून उसाच्या पानावर फवारणी करावी.
- सिंचनाची सोय असल्यास सुरु ऊसाची मोठी बांधणी करुन घ्यावी.
- सुरु ऊसासाठी मोठया बांधणीच्या वेळी १०० किलो नत्र (२१७ किलो युरिया), ५५ किलो स्फुरद (३४४ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) आणि ५५ किलो पालाश (९२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) प्रती हेक्टरी द्यावे.
- ऊसाला युरियाची मात्रा देताना निंबोळी पेडींची भुकटी एक किलो व सहा किलो युरिया असे प्रमाण ठेवावे. किंवा निमकोटेड युरिया वापरावा.
- पूर्वहंगामी आणि आडसाली ऊस जोदार वाढीच्या अवस्थेत असून उन्हाळ्यात पाण्याचा ताण पडणार नाही याची दक्षता घ्यावी.
- खोडवा ऊसाला (खोडवा ठेवल्यानंतर १३५ दिवसांनी) पहारीच्या सहाय्याने रासायनिक खतांचा दुसरा हप्ता म्हणजेच १२५ किलो नत्र (२७२ किलो युरिया), ५५ किलो स्फुरद (३४४ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) आणि ५५ किलो पालाश (९२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) प्रति हेक्टरी द्यावा.
- काणी व गवताळ वाढीची बेटे समूळ काढून नष्ट करावीत.
- ऊसासाठी ठिबक सिंचनाचा वापर करावा. ठिबक सिंचनाची सोय असल्यास १० ते २० आठवडयांपर्यंतच्या सुरू व खोडवा ऊसाच्या वाढीच्या अवस्थेनुसार प्रति आठवडा प्रति एकरी ६.५ किलो युरीया, ४.५ किलो मोनो अमोनिअम फॉस्फेट व २ किलो पांढरे म्युरेट ऑफ पोटॅश ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत.
- ऊस पिकासाठी जास्तीत जास्त क्षेत्रावर शेतकऱ्यांनी ठिबक सिंचन पाणी व्यवस्थापन पध्दतीचा अवलंब करावा.
- ज्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता कमी आहे अशा ठिकाणी यापुढे पाणी देताना एक आड सरीतून पाणी द्यावे.
- पाण्याचा ताण पडत असल्यास उभ्या पिकातील खालची पक्व झालेली तसेच वाळलेली पाने काढून ती आच्छादन म्हणून सरीत पसरावीत. जेणे करून पाण्याचे बाष्पीभवन कमी होवून जमिनीत ओलावा टिकवून राहण्यास मदत होईल.
- पिकास पाण्याचा ताण असल्यास लागणीनंतर ६०, १२० आणि १८० दिवसांनी २% म्युरेट ऑफ पोटॅश व २% युरीया यांचे मिश्रण करून पिकावर फवारणी करावी.
- पाण्याची कमतरता असल्यास बाष्पीभवन कमी करण्यासाठी ६ ते ८% केवोलीन या बाष्परोधकाची फवारणी करावी.
- ऊस पिक हे तण विरहीत ठेवावे. त्यामुळे उपलब्ध पाण्यासाठी होणारी स्पर्धा कमी होवून ऊस वाढीसाठी उपयुक्त ठरेल.
- शेताच्या सभोवती उंच व जलद वाढणारी शेवरीसारखी पिके लावावीत.
- लागवडीच्या ऊस पिकात तसेच खोडव्याच्या पिकास हेक्टरी ५ ते ६ टन पाचटाचे आच्छादन करून प्रती टन पाचटासाठी ८ किलो युरीया, १० किलो सुपर फास्फेट व १ किलो पाचट कुजविणाऱ्या जिवाणूंचा वापर करावा.
- सुरू ऊसासाठी मेच्या तिसऱ्या आठवडयात संजीवकांच्या पाचव्या फवारणीसाठी हेक्टरी ५०० लिटर पाणी लागेल. त्याकरिता जी.ए. ३ जिब्रेलिक ॲसीड (४० पीपीएम) २० ग्रॅम, ६ बी.ए. : ६ बेन्झिल ॲडेनाईन (४० पीपीएम) २० ग्रॅम, ५००० ग्रॅम १९:१९:१९, १२५० ग्रॅम चिलेटेड सुक्ष्म अन्नद्रव्य व २५०० ग्रॅम सिलिकॉन (सिलिसायलिक ॲसिड) एकत्रित करून उसाच्या पानावर फवारणी करावी.
- हुणीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी रात्रीच्या वेळी कडुलिंब, बोर, बाभूळ या झाडांवर जमा होणारे हुणीचे भुंगेरे गोळा करुन रॉकेल मिश्रीत पाण्यात टाकून त्यांचा नाश करावा. हा उपक्रम सामुदायिकरित्या २–३ वेळा करावा.
- ऊसावरील कांडी किडीचा प्रादुर्भाव असल्यास ५ ट्रायकोकार्डस प्रति हेक्टरी मोठया बांधणीनंतर दर १५ दिवसांनी ऊस तोडणीपूर्वी १ महिन्यापर्यंत लावावीत.
- खवले किडीचा प्रादुर्भाव असल्यास प्रति हेक्टरी मोनोक्रोटोफॉस ३६% एस.एल. प्रवाही २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- ऊस पिकास पायरिलाचा प्रादुर्भाव आढळल्यास इपिरिकॅनिया मेल्यॅनोल्युका या परोपजीवी मित्र किटकाचे ५००० जिवंत कोष अथवा ५०००० अंडीपुंज प्रति हेक्टरी वापरावेत.

### भुईमूग (उन्हाळी)

- भुईमूग पीक काढणीयोग्य तयार झाले म्हणजे पाने पिवळी पडू लागतात, शेंगाचे टरफल टणक बनते व टरफलाची आतील बाजू काळी दिसू लागल्यास पिकाची काढणीकरुन भुईमूगाच्या शेंगा चांगल्या वाळवून साठवणूक करावी.

### बागायती कापूस

- मे महिन्याच्या मध्यापर्यंत जमीन चांगली तापल्यानंतर २ ते ३ वखराच्या आडव्या व उभ्या पाळ्या देवून ढेकळे फोडून शेत सपाट करून घ्यावे.
- शेवटच्या वखर पाळी अगोदर हेक्टरी १० ते १२ टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत शेतात पसरावे.
- बीटी कपाशीसाठी पेरणीच्यावेळी हेक्टरी ३१.२५ किलो नत्र, ६५ किलो स्फुरद, व ६५ किलो पालाश द्यावे.
- बिगर बीटी कपाशीसाठी पेरणीच्या वेळी हेक्टरी २० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश द्यावे.
- बीटी कपाशीची लागवड २० मे नंतर ९० सें. मी.ू ९० सें. मी., किंवा १२० सें. मी.ू ६० सें. मी. सऱ्या पाडून करावी.
- बागायती बिगर बीटी कपाशीची लागवड सोलापूर, सांगली, सातारा व पुणे जिल्ह्यासाठी मार्चचा पहिला पंधरवाडा, अहमदनगर जिल्ह्यासाठी एप्रिलचा पहिला पंधरवाडा तर खानदेश, विदर्भ मराठवाड्यातील जिल्ह्यांसाठी मे चा दुसरा पंधरवाडा या दरम्यान करावी.
- पेरणीपूर्वी एका पिशवीतील बियाण्यास प्रत्येकी २५ ग्रॅम ॲझोटोबॅक्टर किंवा ॲझोस्पिरीलम आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळणारे जिवाणू तसेच ५ ग्रॅम ट्रायकोडर्माची बिजप्रक्रिया करून सऱ्या ओलावून पेरणी करावी.
- बीटी कपाशीभोवती ५ टक्के बिगर बीटी कपाशीची (रेफ्युजिया) लागवड करावी.
- पेरणीनंतर उगवणीपूर्वी पेंन्डीमिथॅलिन ३० ई. सी. क्रियाशील घटक ५० ते ८० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून जमिनीवर फवारणी करावी.
- शेतात मित्रकिडींचे संवर्धन होण्याच्या दृष्टीने शेताच्या चहुबाजूने तसेच कापसाच्या दर १० ओळीनंतर एक आड एक मका व चवळी यासारखी सापळा पिके लावावी.
- लागवडीनंतर ८ ते १० दिवसांनी नांग्या भरून घ्याव्यात.

### भात

- पूर्वमशागत : भात पिकाच्या योग्य वाढीसाठी शेताची योग्य प्रकारे पूर्वमशागत करणे अत्यंत महत्त्वाचे असते. पूर्वमशागतीमुळे जमिनीच्या विविध थरांची उलथापालथ होते आणि काही प्रमाणात तण, कीड व रोगांचेही नियंत्रण होते.
- सेंद्रीय खतांचा वापर : नांगरणीच्या वेळी हेक्टरी १० मे.टन शेणखत अथवा कंपोस्ट खत मातीमध्ये पूर्णपणे मिसळून द्यावे.

### भात वाण निवड

| नाव | वैशिष्ट्ये | उत्पादन (क्विं./हे.) | |
|---|---|---|---|
| | | धान्य | पेंढा |
| इंद्रायणी | लांब, पातळ, सुवासिक दाण्यांचीनिमगरवी जात. करपा व पर्णकरपा रोगास मध्यम प्रतिकारक | ४०–४५ | ४४–४८ |
| फुले समृद्धी | लांब, पातळ दाण्यांचीनिमगरवी जात. करपा, कडा करपा व खोड किडीस मध्यम प्रतिकारक | ४५–५० | ४९–५३ |
| भोगावती | लांब, पातळ, सुवासिक दाण्यांची निमगरवी जात. करपा व पर्णकरपा रोगास मध्यम प्रतिकारक | ४०–४५ | ५०–५५ |
| फुले राधा | मध्यम–बारीक, हळवा, करपा व कडा करपा रोगास मध्यम प्रतिकारक. | ३५–४० | ४२–४५ |

### मूग आणि उडिद

- पेरणीपूर्वी खोल नांगरट करावी व कुळवच्या २ पाळ्या दयाव्यात, काडीकचरा वेचून घ्यावा.
- हेक्टरी ५ टन शेणखत

### तूर

- हेक्टरी ५ टन कंपोस्ट / शेणखत टाकावे.
- पेरणीपूर्वी खोल नांगरट करावी व कुळवच्या २–३ पाळ्या देऊन शेत पेरणीस तयार ठेवावे.

### नाचणी

- जमिनीचा प्रकार : उथळ
- जमिनीची खोली : २५–३० सें.मी.
- जमिनीचा पोत : वाळूमय ते पोयटा मिश्रण
- सामू : ६.० ते ७.३, विद्युत वाहकता : ०.१० – ०.४० डेसिसायमन/ मिटर
- शेतीची नांगरट करणे, कुळवणी करणे, शेतातील धसकटे वेचणे
- जमिनीची मशागत : पुर्वमशागत : एक नांगरणी उतारास आडवी आणि दोन कुळवाच्या पाळ्या देणे. पेरणीपूर्वी मशागत करताना सेंद्रिय खताची मात्रा ५ टन/हेक्टरी मिसळावे.

### रब्बी ज्वारी

- पहिला पंधरवाडा – जमिनीची खोल नांगरट करावी.

### बाजरी

- खोल नांगरट व कुळवाच्या दोन पाळ्या द्याव्यात. शेवटच्या कुळवणी अगोदर प्रति हेक्टरी ५ टन शेणखत शेतात मिसळावेत.

### सोयाबीन

- खोल नांगरट व कुळवाच्या दोन पाळ्या द्याव्यात. शेवटच्या कुळवणी अगोदर प्रति हेक्टरी ५ टन शेणखत मिसळावे.

### फळबाग व्यवस्थापन

- डाळिंब – पाणी व्यवस्थापनाकडे विशेष लक्ष द्यावे. जैवीक आच्छादन करावे.शक्यतो फुट काढणी करू नये. फळांना पेपरबॅग लावून संरक्षण करावे खोड किडीचे नियंत्रण करावे.
- बोर – १५ मे दरम्यान छाटणी करावी.
- आवळा – संरक्षित पाणी द्यावे.
- अंजीर – संरक्षित पाणी द्यावे.
- जांभूळ – संरक्षित पाणी द्यावे. खोडांची साल पोखरणारी अळीच्या नियंत्रणासाठी गेरू व कॉपर ऑक्झीक्लोराईड + क्लोरोपायरीफॉस पेस्ट लावावी.
- कागदी लिंबू – उन्हाळ्यात ८–१० दिवसाचे अंतराने पाणी द्यावे. रोगट, किडग्रस्त व वाळलेल्या फांद्याची छाटणी करावी. रसशोषक किडी : थायामेथोक्झाम २५% डब्ल्यु सी. १ ग्रॅम / १० लि. पाणी किंवा क्लोरोपायरीफॉस २० टक्के २० मिली / १० लि. पाण्यातून फवारावे. कोळी : डायकोफॉल २०–२५ मिली/१० लि. पाण्यातून फवारावे. झाडांच्या खोडावरील व फांद्यांवरील डिंक खरडून टाकावे. खोडावर जमिनीपासून २.५ फूट अंतरापर्यंत बोर्डोपेस्ट लावावी.
- पेरु – मृग बहारासाठी पाण्याचा ताण देणे.

### भाजीपाला व्यवस्थापन

- भेंडी व गवार पिकाची काढणी करावी.
- वेलवर्गीय भाजीपाला काढणीचे काम वेळेवर करावे.
- उन्हाळी, मिरची व वांगी पीक फुलोरा अवस्थेत उष्ण व जास्त तापमाणामुळे फुलगळ होण्याची शक्यता असते.
- उन्हाळी मिरची व वांगी पिकामधील फुलगळीचे प्रमाण कमी करून फळधारणा वाढविण्यासाठी संजीवकाची व सूक्ष्म अन्नद्रव्याची फवारणी करावी तसेच पिकाचे उष्ण तापमानापासून संरक्षणासाठी सभोवताल व प्रत्येक चार ओळीनंतर मका पिकाची लागवड करावी.
- टोमॅटो पिकाचे उन्हापासून संरक्षण करावे.
- कीड व रोगाचा प्रार्दुभाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी योग्य उपाय करावेत.

### आले

- आले लागवड १५ एप्रिल पासुन ते जुनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत करावी.
- लागवडीसाठी वरदा, रिजाथा, माहिम, महिमा यासुधारीत जातींची निवड करावी.
- कंद ४ ते ५ सें.मी. खोल लावावेत. कंद पुर्ण झाकले जातील याची दक्षता घ्यावी. आल्याला मध्यम प्रकारची सुर्यप्रकाशाची आवश्यकता असते.
- जमिनीच्या उताराप्रमाणे लागणीची पध्दत निश्चित करुन जमिनीवर उताराच्या दिशेने बेड उठवून घ्यावेत. बेड एकसारखे सपाट होतील याची काळजी घ्यावी.
- बेड तयार करताना ट्रॅक्टरच्या फनपाळ्याचे सरळ बेड तयार करावे. लागणीचे वेळी आढीत ठेवलेले बियाणे बाहेर काढून त्याचे एकसारखे तुकडे करुन (मोड) घ्यावेत.
- आल्याचा तुकडा ज्या दिवशी जमिनीत पुरला जाईल त्याच दिवशी त्या जमिनीस भरपूर पाणी मिळालेच पाहिजे. पाणी जमिनीस एवढे द्यावे किमान लावलेल्या तुकड्याच्या खाली चार ते पाच इंच संपूर्ण ओल गेलेली असावी. अन्यथा दुसऱ्या दिवशी पुन्हा तेवढेच पाणी द्यावे. व त्यानंतरच्या पाण्याच्या पाळ्या जमिनीच्या प्रतवारीनुसार एक दिवसा आड एक दिवस किंवा दोन आड एक दिवस अशी ओल कायमस्वरुपी राखून ठेवली जाईल एवढेच पाणी द्यावे.
- लागणीपासून आठ दिवसांनी हलकी भर टाकावी, कारण लागणी वेळी लांब तुकड्याची टोके जमिनीच्या पृष्ठभागाबरोबर असतात.त्यास उष्णतेची झळ लागू नये किंवा उघडे असणारे डोळे खराब होऊ नयेत म्हणून या भरीची आवश्यकता आहे.
- लागवड केल्यानंतर जमिनीचे तापमान सिंचन देऊन नियंत्रित करणे गरजेचे आहे. जमिनीचे तापमान बाहेरील वातावरणाच्या तुलनेत जास्त असते. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे बेण्यातील ओलावा टिकवुन ठेवणे आवश्यक आहे. बेण्यातील ओलावा कमी झाल्यास उगवण शक्ती व येणाऱ्या फुटव्यावर परिणाम होतो.

### पशुसंवर्धन

- मे महिन्याच्या पहिल्या आठवडयात पशुवैद्यकाच्या सल्लयाने जनावरांना जंतनाशक औषध पाजावे व शेवटच्या आठवडयात लाळखुरकत, फऱ्या व घटसर्प या रोगांच्या एकत्रित रोगप्रतिबंधक लसी टोचून घ्याव्यात.
- उष्माघातामध्ये सर्व प्रथम जनावराला थंड ठिकाणी बांधावे. त्यानंतर थंड पाण्यात ओला केलेला तळवटाचा, पोत्याचा तुकडा जनावराच्या दोन्ही शिंगाच्या मध्ये बांधून तो सतत ओला राहिल याची दक्षता घ्यावी हलके पाचक गुळमिश्रीत खाद्य द्यावे. भरपुर थंड पाणी पिण्यास द्यावे तत्काळ पशुवैद्यकांना बोलावून त्यांचे सल्ल्याने जनावरांवर आवश्यक औषधोपचार करावा.
- गोठयातील हवा खेळती राहिल याची दक्षता घ्यावी. तसेच गोठयात पंखे किंवा पाण्याचे फवारे उपलब्ध ठेवावे. पाण्याचे व्यवस्थापन करावे.

### पॉवर गोठा आणि बायोगॅस

- पॉवर गोठा (सौर ऊर्जा): देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रात जनावरांच्या चाऱ्यासाठी असलेले कुट्टी यंत्र, पाणी व्यवस्थेसाठी असलेले, दुग्धशाळा, दुग्ध प्रयोगशाळा, पशुपोषण प्रयोगशाळा, रक्त तपासणी प्रयोगशाळा इ. चालण्यासाठी सौर प्रणालीचा वापर केला

जातो. त्याची क्षमता ३६ के.व्ही. असून हा एक विशासार्ह प्रदूषणमुक्त करणारा आणि अक्षय स्रोत असून पर्यावरणपूरक आहे.

❖ बायोगॅस : देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रात ऊर्जा संवर्धन आणि बचतीच्या उद्देशाने ५०० किलो क्षमतेचा बायोगॅस प्रकल्प सुरु आहे. दररोज २० घनमीटर गॅस (अंदाजे १० किलो एलपीजी) तयार होतो. सदर गॅसचा वापर दुग्धजन्य पदार्थ प्रक्रियासाठी केला जातो. बायोगॅसमुळे संपूर्ण संशोधन केंद्र ऊर्जेच्या बाबतीत स्वावलंबी बनले आहे. सौर ऊर्जा आणि बायोगॅस प्रकल्पामुळे देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र उर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाले आहे.

**प्रकाशक** : **डॉ. गोरक्ष ससाणे**
संचालक, विस्तार शिक्षण
**प्रमुख संपादक** : **डॉ. सचिन सदाफळ**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
**सहसंपादक** : **श्री. सुनिल राजमाने**
कनिष्ठ संशोधन सहाय्यक, प्रसारण केंद्र
**डिझाईनर** : **श्री. प्रदिप कोळपकर**
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
**श्री. सिध्दार्थ साळवे**
लिपीक–नि–टंकलेखक, प्रसारण केंद्र

**मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २७८५/२०२५**